# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृह

### मा. स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी दि. ११/११/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित विशेष स्थायी समिती बैठकीचे इतिवृत्त.

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांचेकडील पत्र क्र.नपा-२/पिठासीन अधि./मिरा भाईंदर मनपा/२०२१,जा.क्र. १९४ दि. ०१/११/२०२१ अन्वये, मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती या पदावर निवड करणेसाठी श्रीम. निधी चौधरी, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी बोलाविण्यात आलेली आजची विशेष बैठक दुपारी १२.३० वाजता श्रीम. निधी चौधरी, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली. सदर सभेस खालील स्थायी समिती सदस्य उपस्थित होते. उपस्थित सदस्यांची ओळख व खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांनी केली.

<u>उपस्थित सदस्य :-</u>

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. राकेश रतिशचंद्र शाह |
| २ | श्री. हसमुख मोहनलाल गहलोत |
| ३ | श्रीम. शानु जोरावर गोहिल |
| ४ | श्रीम. सुनिता रमेश जैन |
| ५ | श्री. सुरेश जगदीश खंडेलवाल |
| ६ | श्री. आनंद दत्तात्रय मांजरेकर |
| ७ | श्री. मनोज रामनारायण दुबे |
| ८ | श्रीम. सुजाता यशवंत पारधी |
| ९ | श्रीम. सिमा कमलेश शाह |
| १० | श्री. जयेश भानुदास भोईर |
| ११ | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील |
| १२ | श्रीम. शर्मिला विन्सन्ट बगाजी |
| १३ | श्रीम. अर्चना अरुण कदम |
| १४ | श्रीम. कुसुम संतोष गुप्ता |
| १५ | श्रीम. मर्लिन मर्विन डिसा |
| १६ | श्री. अशरफ मोहम्मद शेख |

<u>गैरहजर सदस्य :- निरंक</u>

सर्वप्रथम महानगरपालिका सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व विशेष बैठकीचे प्रयोजन व या निवडीची प्रक्रिया उपस्थितांना समजावून सांगितली व विषयपत्रिकेवरील विषयाचे वाचन केले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती, स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

निर्धारित कार्यक्रमानुसार बुधवार दिनांक १०/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी महानगरपालिका सचिव यांचेकडे प्राप्त झालेले दोन उमेदवारांची चार नामनिर्देशन पत्र पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मा. महानगरपालिका सचिव यांनी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे दिनांक ११/११/२०२१ रोजी दुपारी १२.३१ वाजता सादर केली. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. शाह राकेश रतिशचंद्र | श्री. भोईर जयेश भानुदास | श्रीम. गोहिल शानु जोरावर सिंह |
| २ | श्री. शाह राकेश रतिशचंद्र | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | श्रीम. गोहिल शानु जोरावर सिंह |
| ३ | श्रीम. कदम अर्चना अरुण | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन्ट | श्री. पाटील जयंतीलाल गुरुनाथ |
| ४ | श्रीम. कदम अर्चना अरुण | श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन |

तद्नंतर मा. पिठासीन अधिकारी यांनी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र उपस्थितांसमोर वाचून दाखवले. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(२) नुसार नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम दुपारी १२.३२ वाजता सुरु झाले.

१. सर्वप्रथम श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. भोईर जयेश भानुदास यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्रीम. गोहिल शानु जोरावर सिंह यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननीअंती श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविणेत आले.

२. दुसरे नामनिर्देशन पत्र देखील श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांचे आहे. श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांच्या नामनिर्देशन

पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्रीम. गोहिल शानु जोरावर सिंह यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननीअंती श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

३. तिसरे नामनिर्देशन पत्र श्रीम. कदम अर्चना अरुण यांचे आहे. श्रीम. कदम अर्चना अरुण यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्या श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन्ट यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्री. पाटील जयंतीलाल गुरुनाथ यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननीअंती श्रीम. कदम अर्चना अरुण यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविणेत आले.

४. चौथे नामनिर्देशन पत्रदेखील श्रीम. कदम अर्चना अरुण यांचे आहे. श्रीम. कदम अर्चना अरुण यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्रीम. डिसा मर्लिन मर्विन यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननीअंती श्रीम. कदम अर्चना अरुण यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविणेत आले.

वरीलप्रमाणे दोन उमेदवारांचे चारही अर्ज वैध करण्यात आले. छाननी अंती वैध उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. शाह राकेश रतिशचंद्र |
| २ | श्रीम. कदम अर्चना अरुण |

अशा प्रकारे छाननीचे काम दुपारी १२.३२ मि. सुरु करुन दुपारी १२.३५ मिनीटांनी संपविण्यात आले. त्यानंतर पीठासीन अधिकारी यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(३) अन्वये ज्या कोणत्या उमेदवारास आपले नामनिर्देशन पत्र मागे घ्यावयाचे असेल त्यांनी दुपारी १२.३६ ते दुपारी १२.५१ या १५ मिनिटाच्या कालावधीत लेखी नोटीस देवून नामनिर्देशन पत्र मागे घेता येईल असे जाहिर केले.

दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली नाही. त्यामुळे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात राहिलेले आहेत.

उमेदवार दोन शिल्लक असल्याने नियम ६(२) प्रमाणे उमेदवाराची नावे वर्णानुक्रमे लावणे आवश्यक असुन, वर्णानुक्रमे अंमित नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१) श्रीम. कदम अर्चना अरुण

२) श्री. शाह राकेश रतिशचंद्र

" सभापती " पदाच्या निवडणुकीसाठी दोन उमेदवार शिल्लक राहिले आहेत. सभापती पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन शिल्लक राहिल्याने नियम ६(३) प्रमाणे "हात वर" करुन मतदान घेण्यात येत आहे. प्रथम उमेदवार श्रीम. कदम अर्चना अरुण यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन व स्वाक्षरी करुन आपले मत नोंदवावे, असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले. तेव्हा श्रीम. कदम अर्चना अरुण यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील |
| २ | श्रीम. शर्मिला विन्सन्ट बगाजी |
| ३ | श्रीम. अर्चना अरुण कदम |
| ४ | श्रीम. कुसुम संतोष गुप्ता |
| ५ | श्रीम. मर्लिन मर्विन डिसा |
| ६ | श्री. अशरफ मोहम्मद शेख |

दुसरे उमेदवार श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन व स्वाक्षरी करुन आपले मत नोंदवावे, असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. राकेश रतिशचंद्र शाह |
| २ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल |

| | |
|---|---|
| ३ | श्रीम. शानु जोरावर गोहिल |
| ४ | श्रीम. सुनिता रमेश जैन |
| ५ | श्री. सुरेश जगदिश खंडेलवाल |
| ६ | श्री. आनंद दत्तात्रय मांजरेकर |
| ७ | श्री. मनोज रामनारायण दुबे |
| ८ | श्रीम. सुजाता यशवंत पारधी |
| ९ | श्रीम. सिमा कमलेश शाह |
| १० | श्री. जयेश भानुदास भोईर |

हात वर करुन मतदान घेतले असता १) श्रीम. कदम अर्चना अरुण यांना ०६ इतकी मते व २) श्री. शाह राकेश रतिशचंद्र १० इतकी मते मिळाली. तसेच ०० सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांना मिळाल्याने ते सभापती, स्थायी समिती पदी बहुमताने निवडून आल्याचे नियम ६(७) अन्वये पिठासीन अधिकारी यांनी घोषीत केले.

निवडणूकीबाबत सर्व अभिलेख महापालिका सचिव, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सादर करण्यात आले. अभिलेख्यांच्या प्रमाणित प्रतींची मागणी केल्यावर त्या संबंधितांना देण्याबाबत महापालिका सचिवांना निर्देश देण्यात आले. सभेच्या पूर्ण कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले. तद्नंतर उपस्थितांचे आभार मानून विशेष बैठकीचे कामाकाज दुपारी १२.५८ वाजता संपल्याचे जाहिर केले.

11.11.2021

**(निधी चौधरी)**
**पिठासीन अधिकारी तथा**
**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर**
**स्थायी समिती सभापती निवडणूक २०२१**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**दिनांक :- ११/११/२०२१**
**स्थान :- मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृह, मिरा भाईंदर महानगरपालिका**